# ‘टच दि लाईट‘

युवकांमध्ये उर्जाचा असा स्त्रोत आहे की तो संपूर्ण जगाला आपल्या ऊर्जेने अलौकिक दिव्य प्रकाशाने प्रकाशित करु शकेल. युवकांमध्ये हिमालयासारख्या समस्यांचा डोंगर पार करुन टाकण्याची प्रचंड क्षमता आहे. युवकांनी लक्ष्य ठेवले तर ते आपल्या सकारात्मक भावनांनी प्रत्येक मनुष्याच्या अंत:करणामध्ये उतरुन समाजास शान्तिचा संदेश देऊ शकतात.

युवक अशा महान शक्तिचे नाव आहे की जे जगास नवीन दिशा, नवीन परिवर्तन देण्यात सक्षम असेल. जर युवकांमधील मानसिक क्षमता सकारात्मक विचारांनी प्रवाहित झाल्यात तर त्या प्रवाहात येणारा प्रत्येक व्यक्ति जीवनात नवीन उत्साहाबोबर विश्वात शान्ति स्थापन करण्यात सहभागी होऊ शकेल.

जन्मभूमीवर असलेले नित्सीम प्रेम, राष्ट्रावरील जाज्ज्वल देशभक्ति, वरीष्ठांवरील आदर, लहान मुलांप्रती स्नेह, संकटांना सुसंधी समजून उद्दिष्ठपर्यंत पोहचण्याची इच्छा, लाटांना कापत जाऊन पुढे जाण्याचा उत्साह, मोठ्या संकटांना तोंड देण्याचे साहस, निराशावादी ला आशावादी बनण्यासाठी युवक आपसात एकमत होऊन गेले तर परिवार, समाज, देश अथवा जगाचा कायापालट करण्यास वेळ लागणार नाही.

या उद्देशाने प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाची नोंदणीकृत सहयोगी संस्था राजयोग शिक्षण आणि शोध प्रतिष्ठानाच्या अंतर्गत समाजाची निस्वार्थ सेवा करण्याचे कार्य विविध प्रभागांद्वारे केले जाते. अशा प्रभागांपैकी एक आहे - ‘युवा प्रभाग‘ . या प्रभागाद्वारे समजातील विविध क्षेत्रांमध्ये युवकांना आपला स्वाभिमानाची जाणिव देऊन त्यांना भारतास स्वर्णिम बनण्याच्या पवित्र कार्यास जोडण्याचा आगळा वेगळा प्रयत्न त्वरेने होत आहे. सद्यस्थितीत प्रभागाद्वारे गांव, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर एक भव्य सेवा योजना ‘टच दि लाईट‘ प्रकल्पाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्यांमध्ये जागृति आणणे, राजयोग प्रशिक्षण शिबिर, आध्यात्मिक ज्ञान आणि प्रशिक्षण शिबिर, प्राणायाम, व्यायाम, ग्रामीण युवकांमधील अंधश्रध्दा पासून मुक्ति, कुप्रथा मुक्ति, व्यसनमुक्ति उन्मूलन कार्यक्रम, पदयात्रा, प्रभातफेऱ्या, मेळावे, महोत्सव, संमेलने, प्रदर्शनी, इत्यादि अनेक कार्यक्रम यशस्वी आयोजित केले जात आहे.

## शालेय विद्यार्थ्यंसाठी ‘टच दि लाईट‘ प्रकल्पाचे आयोजन -

आध्यात्मिक शक्तिच्या जोरावर विश्वशांती आणि मानवीय एकते साठी एक नवीन क्रांतीचा संचार करण्यास आणि युवकांचे जीवन समाजासारखे महान व्हावे, या भगीरथ कार्यास मूर्तरुप देण्यासाठी युवा प्रभागाद्वारा संपूर्ण भारतभर पदयात्रेचे यशस्वी आयोजन केले गेले. ज्यामुळे देशातील काना-कोपऱ्यात उत्साहाने ओतप्रोत भरलेल्या राजयोगी युवा बंधू भगिनींनी विश्वात शान्ति आणि मानवीय एकता स्थापन करण्याच्या कार्यात सहयोगी बनण्याचा संदेश पोचविण्यासाठी अहोरात्र, अथक स्वरुपात आपल्या सेवा

दिल्यात. आणि हे कार्य आजसुध्दा विविध कार्ययोजनांमुळे देशभरातील विविध शाळेमध्ये जीवनास बनविण्याच्या सिमेवर उभ्या किशारोवस्थेतील निर्दोष मनाच्या कोमल भावनांना सकारात्मकतेने संपन्न करण्यासाठी टच द लाईट प्रकल्पाच्या माध्यमातून अनवतर रुप आणि तीव्रगतिने आपल्या लक्ष्यापर्यंत पोहचविण्यास अग्रेसर आहे, ज्यायोगे विशेष शैक्षणिक संस्थांमध्ये विविध विद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विविध किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांना नैतिक मूल्यांनी जीवनस्तर उंचविण्याचे आध्यात्मिक सदभावना संदर्भातील शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले गेले.

**विद्यार्थ्यांमध्ये एक नवीन उर्जेचा संचार करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत युवा बंधू भगिनी -**

राष्ट्र विकासाच्या यात्रेचे मुख्य कर्णधार युवकांमधील आंतरीक क्षमतांचा विकास करण्यासाठी युवा प्रभागाच्या वतीने चालविलेले टच दि लाईट प्रकल्पाच्या अंतर्गत युवा सशक्तिकरण सेवायोजना च्या माध्यमातून विद्यालयामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना मूल्योंचा समावेश आणि मूल्यवान जीवन, प्रभावशाली व्यक्तित्व आंतरीक शक्तिंचा विकास, संबंधोंमध्ये मधुरता व समरसता, आत्मशक्ति ने मानसिक आणि बौद्विक विकास, विद्यार्थी, शिक्षक व गुरुजनांमध्ये परस्पर स्नेह व सौहार्द्रपूर्ण समन्वय, लेखन, वक्तत्वय व चित्रकला आदि आपल्यातील प्रतिभांना विकासीत करण्याची आवड, गरमिामय भारताच्या निर्माणासाठी युवकांचे योगदान, श्रेष्ठ संगाचे महत्व, सदगुणांवर चर्चासत्र, प्रत्येकाशी सकारात्मक भावना वृदधी करण्याची युक्ती, जीवन लक्ष्य इत्यादी विषयांना अवगत करीत असतांना त्यांच्यात नवीन उर्जेचा संचार व्हावा यासाठी विद्यार्थी रुचीपूर्वक या विषयांमध्ये यशोशिखर पादाक्रांत करीत आहेत. राष्ट्राचा मूल्यवान ठेवा असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मौलिक रचनात्मक शक्तिंचा विकास होत आहे.

यासंदर्भात सदर उपक्रम राबविल्या जाणाऱ्या शाळा मुख्याध्यापकांच्या प्रतिक्रिया अत्यंत बोलक्या आहेत, अहमदाबाद येथील डी.पी. हायस्कूलचे मुख्यध्यापक आचार्य जयदेव सोनगरा यांचया मते ब्रह्माकुमारीज च्या युवा प्रभागा मार्फत शाळेतील मुलांसाठी दिल्या जाणाऱ्या सेवा निशुल्क, निस्वार्थ व अथक सेवेने विद्यार्थ्यांध्ये आलेले सकारात्मक परिवर्तन प्रशंसनिय आहे.

**विविध स्पर्धांद्वारा विद्यार्थ्यांच्या सृजनशिलतेला साद -**

विद्यार्थ्यांमधील सुप्त प्रतिभांना जागृत कण्याचे विविध खेळ, भाषण स्पर्धांचे सुध्दा अयोजन केले जाते, ज्यायोगे सकारात्मक शारीरिक व्यक्तित्व, दिनचर्या, वेशभूषा, आरोग्य, सवयी, भाषा म्हणजे बोलणे, आध्यात्मिक चिंतन, आत्मनिरीक्षण, सात्विक भोजनाचे महत्व, मानसिक शुध्दता, आपल्या विचारांना कल्याणमय, आशावादी, गुणग्राहकता, दृढता संपन्न बनविणे, समस्यांपासून शिकण्याची प्रवृत्ती, संबंध निभावण्याची कला, जबाबदारीची कला, वेळेचे महत्व, कर्तव्यपरायणता, सभ्यतापूर्ण व्यवहार, सेवाभाव, स्नेह, सहयोग, क्षमाशिलता, अंतर्मुखी, मनन, चिंतन इत्यादी विषयांवरील बौध्दिकांनी विद्यार्थ्यांच्या जेथे

बौध्दिक विकास होतो त्याच प्रमाणे समाजाशी असलेली त्यांची सकारात्मक भावनांना सुध्दा बळ मिळते.

**व्यसनांना नेहमीसाठी 'अलविदा' -**

प्रभागद्वारा संचलित टच द लाईट परियोजनेच्या अंतर्गत शिक्षण संस्थांमध्ये अध्ययन करणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांसाठी निर्धारित सत्र तयार करुन विद्यार्थ्यांच्या समोरील भविष्यातील आव्हानांना तोंड देणे, वाईट संगती पासून दूर ठेवणे, जीवघेणाऱ्या नशा आणणाऱ्या मादक पदार्थांपासून होणाऱ्या क्षतीची माहिती देणे आदि मुळे मुलांवर आयुष्यभर व्यसनमुक्त राहण्याचा दृढसंकल्प करीत आहेत.

त्याच प्रमाणे ग्रामीण क्षंत्रांमध्ये शान्ती आणि बंधभावयुक्त, मूल्यनिष्ठ समाजाच्या निर्माणाचा उद्देश्य घेऊन वेगळया प्रकारच्या आव्हानांचा सामाना करण्याची क्षमता ठेवणारे त्यागमूर्त, चरित्रवान आणि शिस्तीचे उदाहरण कायम ठेवणारे युवकांची फळ निर्माण करण्याचेही कार्य सुरु आहे. व्यसनाधिनतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्येची जाणीव या युवकांमध्ये आल्याने या व्यवसनांना नेहमीसाठी अलविदा करण्याची दृढ प्रतिज्ञा त्यांनी केल्याने या युवकांमधील परिवर्तन पाहून अनेकांना यामुळे व्यसनमुक्त बनण्याची प्रेरणाा मिळाली.

**राजयोगाकडे वाढते आकषर्ण -**

भारताला महान बनविण्याचा संकल्पांना घेऊन युवा प्रभाग मानवकल्याणा बरोबर प्रकृति, पर्यावरण, स्वच्छता, शान्ति चे वातावरण निर्मिती करण्याचा प्रयास करीत आहे, ज्यायोगे भारतीय प्राचिन संस्कृतिचा सहज राजयोगास नवीन वैज्ञानिक दृष्टीकोणास अनुसरुन विज्ञान आणि आध्यात्माचा समन्वय स्थापित करण्याचा प्रयत्न युवा करीत आहे. सामाजिक चळवळीत सक्रीय भाग नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना यासाठी प्रेरित केले जात आहे.

विद्यार्थ्यांमध्ये राजयोगाची आवड निर्माण करण्याचे प्रयत्न, मौन द्वारे राजयोगाच्या माध्यमातून प्रकृति व पांच तत्वांसहित विश्वातील सर्व आत्म्यांमध्ये शान्तिचे दान देण्याचे महान कार्य केले जात आहे. असा अभ्यास करणारी जीवनपध्दती, सुव्यवस्थीत, सकरात्मक सहयोगात्मक रुपाने दुसऱ्यांसाठी एक आदर्शमूर्त व प्रेरणास्त्रोत बनत आहे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स

www.bkvarta.com